# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/07/2023 (मंगळवार) सकाळ


---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात तसेच लगतचे जिल्ह्यात तसेच राज्यात घरफोडीचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार १५,४४,४००/—रू. च्या सोने चांदीच्या दागिन्यांसह गजाआड स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण ची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद यांनी नागपूर ग्रामीण हद्दीत वाढत्या घरफोडीचे गुन्हयांना आळा बसण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सक्त सुचना निर्गमित केल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. यांचे विविध पथक तयार केले.

दिनांक ०३/०७/२०२३ रोजी मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मालमत्ते संबंधी गुन्हयाचा समांतर तपास संबंधाने फिरत असतांना पोलीस ठाणे बुट्टीबोरी अप. क्र. ४३४/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वी. या गुन्ह्या संबधाने अट्टल गुन्हेगार गोपाल उर्फ चोरू दुजेराम देवांगन, वय ३० वर्ष, रा. भिलाई, दुर्ग छत्तीसगढ यास सापळा रचुन ताब्यात घेत विचारपूस दरम्यान त्याने वरील नमूद गुन्हा केल्याचे सांगितले. पुढे अधिक विचारपूस दरम्यान त्याने बुट्टीबोरी, MIDC बोरी, मौदा, गोंदिया शहर, राजनांदगाव येथे अशाच प्रकारे घरफोडीचे गुन्हे केले असल्याचे सांगितले. त्यावरुन त्याचे ताब्यातून सदर गुन्ह्यातील तसेच इतर गुन्ह्यातील चोरी केलेले सोने चांदीचे दागिने पंचासमक्ष ताब्यात घेऊन जप्त करण्यात आले. आरोपीने असे एकुण ०७ गुन्हयांची कबुली दिली.

**उघडकीस आलेले गुन्हे**

१) पोलिस ठाणे बटुटीबोरी ४३४/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी
२) पोलिस ठाणे बुट्टीबोरी ३६८/२३ कलम ४५७, ३८० भादवी
३) पोलिस ठाणे MIDC बुट्टीबोरी २११/२३ कलम ४५७, ३८० भादवी
४) पोलिस ठाणे MIDC बुट्टीबोरी २२५/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी
५) पोलिस ठाणे मौदा ३१९/२३ कलम ४५७, ३८० भादवी
६) पोलिस ठाणे गोंदिया शहर २७७/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी
७) पोलिस ठाणे सोमनी (छ. ग.) ८०/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी

अशा एकुण ०७ गुन्हयातील नागपूर ग्रामीण जिल्हयातील खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
१) एकुण अंदाजे २९५ ग्रॅम १४,४१,०००/— रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने २) एकुण २०८४ ग्रॅम १,०१,६००/— रुपये किमतीचे चांदीचे दागिने व इतर साहित्य एकुण १५,४४,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीची वैद्यकिय तपासणी करून संबंधित कागदपत्रे व जप्त मुद्देमाल सह पुढील कायदेशीर प्रक्रियेकरिता पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद सर (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अशिषसिंह ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस

हवालदार महेश जाधव, मिलिंद नांदुरकर, अरविंद भगत, मयूर ढेकळे, निलेश बर्वे, पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किनगे, बालाजी साखरे, सतिष राठोड महिला पोलीस नायक वनिता शेंडे चालक सुमित बांगडे, आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर